# सन २०१४-१५ मधील रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम मार्गदर्शक सूचना

शासन निर्णय क्र.रोहयो २०१३/प्र.क्र.२१/९अे दिनांक २ जुन २०१४ अन्वये सन २०१४-१५ मध्ये रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम राबविण्यासाठी फळपिकनिहाय व जिल्हानिहाय एकूण ११२०० लक्ष्यांकास मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर योजनेचे मागदर्शक सूचना योजनेच्या अमंलबजावणी साठी या सोबत सहपत्रीत केले आहे.सोबत शासन निर्णयाच्या प्रतिसह फळपिकनिहाय व जिल्हानिहाय मंजूर लक्षांक सहपत्रित केला आहे. मंजूर लक्षांकाचे अधिन राहून खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना नुसार, योजना क्षेत्रिय अधिका-यांनी राबविण्यासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम या योजनेचा शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमामध्ये समावेश आहे. या कार्यक्रमातंर्गत लाभ घेणा-या लाभार्थ्यांच्या (सर्वसाधारण लाभार्थी जे मग्रारोहयो (नरेगा) अंतर्गत फळबाग लागवडीस पात्र नाहीत) ७/१२ वर त्याबाबतची नोंद घेतल्याशिवाय अनुदान देण्यात येवू नये. रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम ही योजना प्रकल्प आधारीत राबविण्यात यावी. एका प्रकल्पात किमान ५० हे. समावेश असावा. त्यासाठी २०-२५ शेतक-यांचा एक गट याप्रमाणे गटाचे समुह पध्दतीने प्रकल्प तयार करुन, (क्लस्टर करुन) लागवड करण्यात यावी. आणि सोबत दिलेल्या प्रपत्रात प्रकल्प आधारीत माहिती आयुक्तालयास त्वरीत पाठवावी.

फळपीकनिहाय उद्दिष्टामध्ये बदल करावयाचा झाल्यास जिल्हास्तरीय समितीमार्फत तसे बदल करण्यात यावेत. तसेच जिल्हयाला दिलेल्या फळपिकांच्या उद्दिष्टांव्यतिरिक्त तांत्रिक सल्ल्यानुसार काही इतर फळपिके घ्यावयाची असल्यास जिल्हास्तरीय समिती त्याबाबत निर्णय घेण्यास सक्षम राहील. तसेच एकूण लक्ष्यांकाच्या मर्यादेत आवश्यकतेनुसार फळपीकनिहाय व जिल्हानिहाय लक्ष्यांकात बदल करण्यास संचालक,फलोत्पादन,कृषि आयुक्तालय, पुणे यांना प्राधिकृत केले आहे. त्यानुसार संबधीत विभागामार्फत मंजूरीसाठी प्रस्ताव पाठवावा.

१. लाभधारक निवड अर्हता :-

१.१ गावांत ज्यांच्या नावावर जमीन आहे असे सर्व शेतकरी, विश्‍वस्त कायद्याखालील संस्था, सहकारी कायद्याखालील प्रमाणित झालेल्या मान्यता प्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व इतर सूत गिरण्या वगळून), ही जमीन कुळकायद्याखाली येत असल्यास ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नांव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबविण्यात यावी. यासाठी रु.२०/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र घेणे आवश्यक राहणार नाही.

२. लाभार्थी निवड करण्याची पध्दती :-

२.१ या योजनेची माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी स्थानिक मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी. त्यात योजनेत सहभागी होण्यासाठी कोणत्या अधिकाऱ्यांकडे अर्ज करावा, त्यासाठी अर्जाचा नमुना कोणत्या ठिकाणी उपलब्ध होईल व अर्ज किती तारखेपर्यंत सादर करावा इत्यादी बाबतची माहिती असेल.

२.२ हा कार्यक्रम राबविणेसाठी प्रत्येक गावात लाभार्थीची निवड करण्यासाठी गावातील सरपंच / ग्राम पंचायत यांच्या सहकार्याने या योजने अंतर्गत कोणाला व किती लाभ घेता येईल याबाबत ग्रामसभा घ्यावी. या सभेचे इतिवृत्त लेखी ठेवावे व सभेस उपस्थित असलेले शेतकरी योजनेत भाग घेणार आहेत किंवा नाही याची नोंद अभिलेखात ठेवावी. ग्रामसभेच्या वेळी योजनेच्या माहिती पत्रकांचे वितरण करावे. या योजनेत सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेला अर्जाचा नमुना परिशिष्ठ क्र.४ (अ) व ४ (ब) मध्ये दर्शविल्याप्रमाणे ग्राम पंचायत कार्यालयांत माहितीस्तव उपलब्ध करावेत. अर्ज भरुन कोणत्या तारखेपर्यंत सादर करावे या बाबतची माहिती त्यावरच द्यावी.

२.३ ही योजना चालू झाल्यापासून ज्या गावाचा योजनेत अद्यापपर्यंत समावेश झाला नाही अशा गावांचा चालू वर्षी प्राधान्याने समावेश करण्यात यावा.

२.४ ग्रामसभा घेणे, माहितीपत्रके तसेच अर्जाचे वाटप आणि अर्ज गोळा करणे या संबंधीची कामे विहीत मुदतीत पूर्ण करावीत.

२.५ आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी माध्यमाचा उपयोग करुन मोठया प्रमाणात योजनेस प्रसिध्दी द्यावी, माहिती पत्रके छापणे, स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देणे इत्यादी साठी येणारा खर्च प्रमाणाकातील संकीर्ण या बाबीखाली मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

२.६ परिशिष्ठ ४ (अ) मध्ये दर्शविल्याप्रमाणे लाभार्थीने योजनेचा लाभ घेण्याबाबतचे विनंती पत्रक तसेच करारनामा परिशिष्ठ ४ (ब) मध्ये दर्शविल्या प्रमाणे विहित नमुन्यांतील फॉर्म इच्छुक लाभार्थींना उपलब्ध करुन देण्यांत यावेत.

२.७ इच्छुक लाभार्थींनी वरीलप्रमाणे विहित नमुन्यांतील आवश्यक माहिती ७/१२ व ८-अ चे उताऱ्यासह सादर करावे.

२.८ गाव पातळीवर प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी, ग्राम पातळीवरील कर्मचारी यांनी करुन अर्जामध्ये काही त्रृटी असल्यास या त्रृटींची संबंधित शेतकऱ्यांकडून लगेच पूर्तता करुन घ्यावी.

२.९ प्राप्त झालेल्या अर्जामधून कमीत कमी १५ टक्के अनुसूचित जाती/ जमातीच्या लाभार्थींची निवड करावी.

२.१० मंडल कृषि अधिकारी हे कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांच्या सहाय्याने त्यांना दिलेले फळपीकनिहाय लागवडीचे उद्दिष्ट लक्षात घेऊन लाभार्थीची निवड करतील.

२.११ लाभार्थीची निवड करताना लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले असल्यास निवड बाबतचे प्राथम्य खालील प्रमाणे ठरविण्यात यावे. यामध्ये अनुसूचित जाती/जमाती/अल्प व अत्यल्प भूधारक व नंतर इतर मधील अल्प व अत्यल्प भूधारक यांना प्राधान्य देण्यात यावे.

१. जलसंधारणाच्या पाणलोट क्षेत्रातील गावात फळझाड लागवडीस प्राधान्य देण्यात यावे.

२. पडीक जमिनीवर लागवडीचा प्रस्ताव.

३. कोरडवाहू फळपिकाचे लागवडीचे प्रस्ताव.

४. ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे त्या ठिकाणी फळझाड लागवडीचे प्रस्ताव

५. नवीन गावांना तसेच नवीन लाभार्थींना प्राधान्य दयावे.

६. महिला लाभार्थींना प्राधान्य द्यावे.

७. ज्या लाभार्थ्यांकडे पाण्याची सुविधा उपलब्ध आहे त्यांना त्यांच्या वर्गात प्राधान्य दिले जाईल.

८. सलग समतल चर घेतलेल्या क्षेत्रावर (सी.सी.टी) फळझाडांच्या लागवडीसाठी लाभार्थीची निवड

प्राधान्याने करावी.

९. ज्या लाभार्थीची आगीमुळे फळबाग जळाली आहे अशा लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा.

१०. ज्या जिल्हयामध्ये जमीन व हवामानानुसार जी फळझाडे चांगल्या प्रकारे येऊ शकतात त्याच लागवडीसाठी प्राधान्य देण्यात यावे

३. क्षेत्रमर्यादा :-

३.१ ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयांतील सर्व तालुके आणि पश्चिम घाट क्षेत्रातील खालील तालुक्यामण्ये लागवडीची प्रती लार्भार्थी कमीत कमी क्षेत्रमर्यादा ०.१० हेक्टर राहील.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | तालुक्याचे नाव |
|---|---|---|
| १ | नाशिक | नाशिक, इगतपूरी, त्रंबक, पेठ, सिन्नर, दिंडोरी, सुरगणा, कळवण, सटाणा |
| २ | धुळे | साक्री |
| ३ | नंदुरबार | नवापूर |
| ४ | सातारा | वाई, खटाव, कोरेगाव, खंडाळा, पाटण, सातारा, महाबळेश्वर, जावळी |
| ५ | सांगली | शिराळा |
| ६ | कोल्हापूर | राधानगरी, करवीर, शाहूवाडी, पन्हाळा, भुदरगड, गगनबावडा, आजरा, चंदगड, गडहिंग्लज, कागल |
| ७ | पुणे | वडगाव मावळ, भोर, वेल्हा, आंबेगाव, खेड, हवेली, मुळशी, पुरंदर, जुन्नर |
| ८ | अहमदनगर | संगमनेर, अकोले |

राज्यातील उर्वरित भागात लागवडीची प्रती लार्भार्थी कमीत कमी क्षेत्र मर्यादा ०.२० हेक्टर राहील. कोकण विभागाकरिता प्रती लाभार्थी लागवडीची जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा १० हेक्टर राहील.कोकण विभाग वगळता राज्यातील इतर भागात प्रती लाभार्थी लागवडीची क्षेत्रमर्यादा जास्तीत जास्त ४ हेक्टर राहील

३.२ ज्या शेतकऱ्यांनी फलोत्पादन विकासाच्या इतर योजनांमध्ये तसेच रोजगार हमी योजनेतंर्गत राबविण्यांत येत असलेल्या कार्यक्रमांतर्गत यापूर्वी भाग घेतला असेल तर, त्यांचे पूर्वीचे क्षेत्र गृहीत धरुन एकूण ४ हेक्टर क्षेत्र मर्यादे पर्यंत हा कार्यक्रम शेतकरी राबवू शकतील. मात्र पूर्वी त्यांचेकडे यापूर्वी जी लागवड करण्यात आलेली आहे, ती यशस्वी झाली असली पाहिजे. कोकण विभागात जास्तीत जास्त १० हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत हा कार्यक्रम राबविता येईल.

३.३ विश्वस्त कायदयातील संस्था, सहकारी कायदया खालील प्रमाणित झालेल्या मान्यता प्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्या वगळून), १० हेक्टर कमाल मर्यादेपर्यंत लागवड करु शकतील. ही लागवड एका वर्षात किंवा त्यानंतरच्या कालावधीत देखील करता येईल.

३.४ लाभधारकांचे ७/१२ उताराच्या नोंदणीनुसार जर तो संयुक्त खातेदार असेल तर, त्याच्या हिश्याचे क्षेत्राच्या प्रमाणानुसार लाभ देण्यात येईल.

४. फळझाड लागवडीसाठी मुदत :

सदर योजने अंतर्गत लागवड करावयाच्या फळझाडांची यादी शासन निर्णयात नमूद केली आहे. त्यानुसार कोकण विभागामध्ये आंब्याच्या हाफूस जातीची सलग लागवड करताना २० टक्के आंब्याच्या इतर जातीची लागवड करणे आवश्यक राहील. (उदा. केशर, रत्ना, पायरी, सिंधु, गोवामानखुर, राजापूरी )

वरील फळझाड लागवड योजना योग्य रीतीने राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रमाचे वेळापत्रक आयुक्तालयाकडून सर्व संबंधीताना यापूर्वीच वितरीत करण्यात आले आहे.कृषि आयुक्तालयास शासनास व लैंक आयुक्ताकडे फळबाग लागवडी संदर्भात प्रशासकीय मान्यता नसताना लागवड सालाची प्रकरणे निर्दशनात आली आहेत.त्यामुळे कलमे/रोपे विक्रीची व लाभार्थाना देय अनुदान प्रलंबीत राहातात.अश्या प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून याद्वारे अश्या सुचना देण्यात येतात की प्रथमतः तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही तातडीने पुर्ण करावीत तदनंतर प्रत्यक्ष लागवड कार्यक्रम हाती घेण्यात यावा.प्रशासकीय मान्यतेशिवाय कोणत्याही परिस्थितीत सन २०१४-१५ मध्ये लागवड केली जाणार नाही यांची अंत्यत काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.या वेळापत्रकानुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी. कोकण विभागासाठी ३० सप्टेंबर व उर्वरीत विभागासाठी ३० नोव्हेंबर २०१४ पर्यंत लागवड करण्यात यावी. पानपिंपरीची लागवड २८ फेब्रूवारी २०१५ पर्यंत करण्यात यावी.

५. मातीचे परिक्षण -

या योजनेतंर्गत फळझाड लागवडीसाठी खड्डे खोदल्यानंतर विविध थरातील समस्या असलेल्या मातीच्या नमुन्यांचे परिक्षण करणे आवश्यक असून या योजने अंतर्गत भाग घेणाऱ्या नवीन तसेच जुन्या शेतकऱ्यांच्या फळबागातील मातीचे नमुने क्षेत्रीय कर्मचा-यांनी काढून प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठवावे.मातीच्या थराची तपासणी विशेषतः लिंबुवर्गीय फळपिकांची लागवड करण्यापूर्वी होणे आवश्यक आहे. या योजनेतंर्गत तपासणी करावयाचा खर्च हा संकीर्ण बाबी मधून अदा करण्यात यावा. सदर तपासणी ही कृषि विद्यापीठ व कृषि विभागाकडील प्रयोगशाळांमध्ये प्राधान्याने लागवडीपुर्वी करण्यात यावी.

६. फळबाग लागवडीसाठी तांत्रिक मार्गदर्शन :-

सन २०१४-१५ मध्ये ११२०० हेक्टरचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे. सदर उद्दिष्ट ठरविताना लागवडीचे नियोजन परिपूर्ण व्हावे. तसेच लाभार्थी शेतकऱ्यांना क्षेत्रीय परिस्थिती नुसार तांत्रिक मार्गदर्शन करण्याकरिता प्रत्येक जिल्हयांतील किंवा विभागातील तज्ञ अधिकाऱ्यांची समिती गठित करण्यात यावी. ही समिती लागवडींचे नियोजन, लागवडी नंतरची पहाणी, संबंधीत फळपीक व लागवडी संबंधीचे तांत्रिक प्रशिक्षण, क्षेत्रीय भेटी इत्यादीवर आधारित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना/ कर्मचाऱ्यांना व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करील.

७. प्रस्तावास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी :-

७.१ उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे निवड करण्यात आलेल्या लाभार्थींची गाव निहाय, प्रस्ताव क्षेत्रीय पातळीवरील कर्मचा-यांनी जसजसे अर्ज प्राप्त होतील तसतसे मंडळ कृषि अधिकारी यांचे मार्फत तयार करुन ते लाभार्थींच्या सर्व माहितीसह (३ प्रतीत) तांत्रीक मान्यते साठी तालुका कृषि अधिकारी यांचे कडे सादर करावेत.तदनंतर तालुका कृषि अधिकारी हे उप विभागीय कृषि अधिकारी यांना सादर करतील. उप विभागीय कृषि अधिकारी सदर प्रस्तावाची तपासणी करुन रुपये ५.०० लाख मर्यादे पर्यतच्या प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देतील व त्यानुसार तालुका कृषि अधिकारी यांना परिशिष्ट-४ क प्रमाणे कळवतील. उप विभागीय कृषि अधिकारी त्यांचे उप विभागातील तांत्रिक प्रस्तावांना मंजूरी देऊन, जिल्हा अधिक्षक कृषि

अधिकारी यांचे मार्फत प्रशासकीय मंजूरी साठी जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव सादर करतील. फळझाड लागवड कार्यक्रम हा वैयक्तीक शेतक-याच्या शेतावर राबविण्यात येत असल्याने आणि हा कार्यक्रम ऐच्छीक असल्याने वेळीच प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी यंाचेकडे सादर करणे अडचणीचे ठरते. असे जरी असलेतरी सन २०१४-१५ मध्ये मा.जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी घेऊनच प्रत्यक्ष लागवड हाती घेण्यात यावी. प्रशासकीयमंजुरी शिवाय लागवड केलेले क्षैत्र अनुदानास प्रात्र ठरणार नाही.

७.२ जिल्हयाचे अधिक्षक कृषि अधिकारी हे रु.८.०० लाख मर्यादे पर्यतच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता देतील व सर्व संबंधीतांना कळवतील.

७.३ विभागीय कृषि सह संचालक हे रुपये १६.०० लाख पर्यतच्या प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देतील व सर्व संबंधीतांना कळवतील.

७.४ या योजनेतंर्गत तांत्रिक मंजुरी दिलेल्या लाभार्थीना अर्ज स्वीकृत झाल्याचे लेखी कळविण्यात यावे व प्रशिक्षणास परिशिष्ट-४- क प्रमाणे हजर राहणे बाबत कळविण्यात यावे.तसेच लागवड पूर्व कामे करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.खड्डे खोदण्याचे काम वेळेत पूर्ण होईल याची दक्षता घेण्या बाबत कळविण्यात यावेत.

७.५ या योजनेतंर्गत ज्या लाभधारकांनी ४ हेक्टरपर्यत लाभ घेतलेला आहे.अशा लाभधारकांची यादी उप विभागीय कृषि अधिकारी यांनी तयार करुन ती अधिक्षक कृषि अधिकारी यांना पाठवावी म्हणजे त्या यादीतील लाभधारकांच्या प्रकरणांना ४ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रांस तांत्रिक मंजुरी दिली जाणार नाही. कोकण विभागासाठी ही मर्यादा १० हेक्टरची राहील.

७.६ रोजगार हमी योजनेशी निगडीत फळविकास योजने अंतर्गत लाभार्थी मयत झाल्यास त्या क्षेत्राकरिता देय अनुदान त्याचे वारसास, वारसा हक्क तहसीलदार यांचेकडून प्रमाणित केल्यानंतर देण्यात यावे.

७.७ एखादया लाभार्थ्याने योजनेतील लागवड क्षेत्र इतर शेतकऱ्यास विक्री किंवा इतर तरतुदीनुसार हस्तांतरीत केले असेल तर तालुक्याचे तहसीलदार यांचेकडून जमीन हक्क हस्तांतरानुसार ७/१२ व ८-अ उतारा प्राप्त करुन योजनेचा उर्वरित लाभ देण्यात यावा व तशी नोंद मापन पुस्तिकात करावी.

७.८ योजनेचा लाभ घेतल्यासंबंधीची नोंद होण्यासाठी लाभार्थ्याच्या ७/१२ च्या उताऱ्यावर इतर हक्क सदरी पुढील प्रमाणे नोंद घेण्याची कार्यवाही महसुल विभागाने करावी. 'शासनाच्या फलोत्पादन विकास योजनेचा लाभ घेतला आहे. क्षेत्र हेक्टर ........... मंजुर अनुदान रुपये ................. तालुका कृषि अधिकाऱ्यांनी लाभार्थीची यादी तालुक्याचे तहसिलदार यांना प्रति वर्षी द्यावी.

८. लाभधारकांना प्रशिक्षण :-

८.१ शेतकरी प्रशिक्षण : प्रशिक्षणाचा कार्यक्रम उप विभागीय कृषि अधिकारी यांनी निश्चित करावा व शक्यतो ग्राम पातळीवरच प्रशिक्षणाचे आयोजन करुन प्रशिक्षणाचे काम मंडळ व तालुका कृषि अधिकारी यांचे मदतीने लागवडी पूर्वी एकदा व लागवडी नंतर एकदा पूर्ण करावे. या प्रशिक्षणा साठी लागणारा निधी संकिर्ण बाबीखाली असलेल्या अनुदानातून करण्यात यावा. शेतक-यांचे प्रशिक्षणा साठी राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत असलेल्या प्रशिक्षणाच्या प्रमाणका नुसार खर्च करण्यांत यावा.या योजनेमध्ये प्रशिक्षणाची बाब महत्वाची असून लागवड करणेसाठी निवडलेल्या सर्व लाभधारक शेतक-यांचे प्रशिक्षणवर्ग आयोजित करण्याची जबाबदारी उप विभागीय कृषि अधिकारी यांची राहील.

८.२ रोजगार हमी योजनेशी निगडीत फळविकास कार्यक्रमाचे प्रशिक्षणा साठी मेळावे आयोजित करतांना त्यामध्ये एक तज्ज्ञ अधिकारी व दोन तज्ज्ञ बागायतदार तसेच योजनेत पूर्वी लाभ घेतलेले लाभार्थी यांची व्याख्याने आयोजित करावीत. मेळाव्या साठी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यांत यावी. लाभार्थींना प्रशिक्षणांत लागवडीची/योजनेची माहिती, त्यांनी करावयाची कामे, अनुदान व लागवडी नंतर फळबागेचे संवर्धन इत्यादि बाबत माहिती देण्यांत यावी. या शिवाय इतर तांत्रिक बाबी संबंधात म्हणजे खडडे खोदणे, शास्त्रोक्त पद्धतीने खड्डे भरणे, लागवड करणे, खते देणे, पाणी देणे, काढणी पश्चात तंत्रज्ञान, पिकसंरक्षण, कलमीकरण व मार्केटिंग इत्यादि बाबतची माहिती प्रात्यक्षिका सहीत देण्यांत यावी. विभागीय कृषि सह संचालक यांनी त्यांच्या विभागातील प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे नियोजन पूर्णपणे राबविणे आवश्यक राहील.

८.३ एका प्रशिक्षण कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त ७५ लाभार्थींची तुकडी असावी.

८.४ लाभधारकांना शक्यतो तालुक्या बाहेर प्रशिक्षणा साठी जावे लागणार नाही याची दक्षता घेऊन प्रशिक्षण कार्यक्रमाचे ठिकाण निश्चित करावे.

९. अनुदानाची मागणी :

सर्व तालुक्यांची मागणी एकत्रित करुन, उप विभागीय कृषि अधिकारी यांनी ती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावी. सर्व तालूक्यांची मागणी एकत्रित करुन, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी उप संचालक, वनीकरण यांचे प्रमाणपत्रासह संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे विहीत मुदतीत (पहिल्या सहामाही साठी मार्च महिन्यात, दुस-या सहामाही साठी सप्टेंबर महिन्यात) विहीत प्रपत्रात मागणी नोंदवावी व त्याची प्रत शासनाचे नियोजन विभागास व कृषि आयुक्तालयास सादर करावी. अनुदान प्राप्त झाल्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी उप विभागीय कृषि अधिकारी यांना अनुदान उपलब्ध करुन द्यावे. तालुका कृषि अधिकारी यांनी पहिले सहामाहीचे अनुदानातून मागील वर्षातील जिवंत फळझाडांचे क्षेत्राच्या टक्केवारी नुसार लाभार्थींच्या थकबाकीची देय रक्कम प्राधान्याने अदा करावी. दुस-या सहामाहीच्या पतमर्यादेची मागणी करते वेळी चालू वर्षी सन २०१४-१५ मध्ये लागवड केलेल्या फळपीक निहाय क्षेत्राचा गोषवारा जिल्हाधिकारी यांना कळवावा.

१०. अनुदानाचा दर :-

या योजनेंतर्गत समाविष्ट झालेल्या सर्व लाभार्थींना त्यांनी केलेल्या कामानुसार मजूरीसाठी देय असलेले अनुदान १०० टक्के देण्यांत येईल. तथापि सामग्री साठी देय असलेले १०० टक्के अनुदान हे अनुसूचित जाती / जमाती, नवबौध्द, भटक्या जमाती, विमुक्त जमाती तसेच नाबार्डच्या व्याख्येनुसार (लहान शेतकरी १ हेक्टर पेक्षा जास्त पण २ हेक्टर (५ एकर) पर्यत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक किंवा कुळ) व सिंमांत शेतकरी (१ हेक्टर पर्यत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक किंवा कुळ) असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना देण्यांत येईल, तर उर्वरित शेतक-यांना सामुग्री साठी देय असलेल्या अनुदानाच्या ७५ टक्के अनुदान देण्यांत येईल. शासन निर्णय क्र. रोहयो-२००७/प्र.क्र.१२३/रोहयो-१/दि.२४ जानेवारी,२००८ अन्वये मंजूर असलेल्या फळपिकनिहाय आर्थिक मापदंडाप्रमाणेच अंदाजपत्रक तयार करावे. अनुदान वाटप एकूण अनुदानाच्या ५०: ३० : २० टक्के या प्रमाणात राहील.त्याची पध्दत परिशिष्ट-५ मध्ये दर्शविण्यांत आलेली आहे.

११. अनुदान वितरीत करण्याचे निकष :-

११.१ या कार्यक्रमांतर्गत लाभ घेणा-या लाभार्थ्याच्या ७/१२ वर त्याबाबतची नोंद घेतल्याशिवाय अनुदान देण्यात येऊ नये.

११.२ पहिल्या वर्षी लाभार्थ्याने केलेल्या कामाच्या प्रमाणका नुसार मापन पुस्तिकेत नोंद घेऊन मापदंडा नुसार तपासणी नंतर देय असलेले अनुदान देण्यांत यावे. त्यामध्ये पाणी देणे, अंतरमशागत, कुंपण या बाबीवरील खर्च पहील्या वर्षी देण्यात येऊ नये. दुस-या व तिस-या वर्षी एकत्रीतपणे देण्यात यावा.

११.३ दुस-या व तिस-या वर्षी बागायती फळपिकांचे बाबतीत जे लाभार्थी कमीत कमी ९० टक्के आणि कोरडवाहू फळपिकांच्या बाबतीत ७५ टक्के झाडे जिवंत ठेवतील त्या लाभार्थ्यांना दुस-या व तिस-या वर्षाचे अनुदान देय राहील.

११.४ वरील प्रमाणे सदर योजने अंतर्गत लाभार्थ्याला दुस-या किंवा तिस-या वर्षाच्या अनुदानासाठी पात्र ठरविण्या करीता उपरोक्त १०.२ मध्ये दर्शविलेली जिवंत फळझाडांची टक्केवारी नुसार अनुदान देय राहील.

११.५ लाभार्थीकडे २० टक्क्यापेक्षा जास्त कलमा/रोपांची मर असल्यास काही लाभार्थी रोखीने कलमे / रोपे विकत घेऊ शकत नाहीत.पर्यायाने जिवंत झाडांची टक्केवारी विहित प्रमाणात राखली जात नाही. म्हणून ज्या लाभार्थीकडे २० टक्क्यापेक्षा जास्त कलमा/रोपांची मर आहे असे लाभार्थीचे क्षेत्रावर जिवंत झाडांचे प्रमाण वाढविणेचे दृष्टीने नांग्या भरणेसाठी आवश्यक लागणारी कलमे/रोपे यांचा पुरवठा परवाना पत्राद्वारे करण्यात यावा व २० टक्क्यापेक्षा जास्त नांग्या भरण्यासाठी जादा कलमा/रोपांची रक्कम संबंधित लाभार्थीच्या देय असलेल्या अनुदानातून कपात करण्यात यावी.

११.६ सन २०१४-२०१५ मध्ये ज्या लाभार्थ्यांनी या योजनेतंर्गत लाभ घेतला आहे. त्यांची यादी नोंदणीकृत पोचव्दारे ग्राम पंचायत नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

११.७ जट्रोफा बियांच्या खरेदी बाबत किंवा उत्पादनाबाबत कृषि विभागाची अथवा शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१२. लाभार्थीच्या जबाबदाऱ्या :-

१२.१ योजनेत भाग घेणारा लाभार्थी हा गावातील त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर काम करण्यासाठी स्वतः व आपल्या कुंटूबातील कार्यक्षम व्यक्तीस रोजगार हमी योजने अंतर्गत प्रमाणित मजूर म्हणून घोषित करील.

१२.२ योजने अंतर्गत शासनाने ठरवून दिलेली खर्च प्रमाणके ही वैयक्तिक भाग घेणाऱ्या लाभार्थ्यांस मंजूर करावीत व निश्चित केलेल्या खर्च प्रमाणका पेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी स्वतः घेण्याबाबत त्याची लेखी संमती घ्यावी.

१२.३ लाभार्थ्याना देय अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी त्याने राष्ट्रीयकृत बॅक अथवा सहकारी बँकेत खाते उघडावे व खाते क्रमांक तालुका कृषि अधिकारी यांना कळवावे.

१२.४ पूर्व पावसाळी कामे पूर्ण केल्याबद्दल लाभार्थ्याने तालुका कृषि अधिकारी यांना कळवावे.

१२.५ संपूर्ण लागवड कार्यक्रमा साठी पूर्व हंगामी मशागत कामे, खड्डे खोदणे, झाडांची लागवड, पाणी देणे, किटकनाशके औषधे फवारणी करणे व झाडांचे संरक्षण करणे या गोष्टी लाभधारक शेतकऱ्याने स्वतः करावयाच्या आहेत अशी लेखी संमती लाभधारका कडून घ्यावी.

१२.६ लाभार्थी जर संस्था असेल तर,

अ) संबंधीत संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांना त्यंाचे स्वाक्षरीने करारनामा तयार करुन प्रस्तावा सोबत द्यावा लागेल.

ब) लाभार्थी संस्थेने या कार्यक्रमातंर्गत भाग घेण्याकरीता विविध ठराव करुन प्रस्ताव सोबत द्यावा लागेल.

क) वरील संस्थांनी रोजगार हमी योजनेच्या नियमा नुसार मजुरांकडून काम करुन घेणे आवश्यक असल्याने त्यांची उपलब्धता व त्यांचेकडून काम करुन घेणे व त्या संबंधीचे प्रमाणपत्र संबंधीत अधिका-यांनी द्यावे.

ड) लागवडीकरीता लागणारी सर्व कागदपत्रे लाभार्थी संस्थेने मिळवायची असून प्रकल्प अहवाल त्यांनीच तयार करावयाचा आहे.

१२.७ लाभार्थी जर कृषि विद्यापीठ असेल तर,

सन २००२-२००३ पासून राज्यातील कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर फळझाडांची लागवड करण्यास रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवडीव्दारे फळविकासाच्या योजनेअंतर्गत मान्यता देण्यात आली आहे. सन २०१४-१५ यावर्षी राज्यातील कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर फळझाडांची लागवड करण्यास रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवडीव्दारे फळविकासाच्या योजनेअंतर्गत मान्यता असून या कार्यक्रमांतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना (आवश्यक आहे तेथे योग्य बदलासह) या लागवडीस लागू राहील.

१२.७.१. कृषि विद्यापीठाच्या परिसरात हा कार्यकम राबवावयाचा असल्यास सदर परिसर जर 'अ' व 'ब' नगर पालीकेच्या कार्यक्षेत्रात येत असेल तर तेथे ही योजना राबविता येणार नाही.'क' नगर पालीका व ग्रामीण क्षेत्रातील कृषि विद्यापीठाचे परिसरात या योजने अंतर्गत फळझाडांच्या लागवडीचा कार्यक्रम राबविता येईल.

१२.७.२. प्रस्तावास प्रशासकीय व तांत्रीक मान्यता :-

कृषि विद्यापीठ, त्यांचे संबंधीत प्रक्षेत्र ज्या जिल्हयात आहे त्या जिल्हयाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे तांत्रीक मान्यतेसाठी आपले प्रस्ताव सादर करतील. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे ८. लाखाच्या प्रस्तावांना मान्यता देतील. त्यापेक्षा अधिक रकमेचे रु.१६.०० लाखा पर्यंतचे प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे संबंधीत संभागाच्या विभागीय कृषि सह संचालक यांचेकडे मंजुरीसाठी पाठवतील व प्रशासकीय मान्यता जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांची घेतील.

१२.७.३ अनुदानाची मागणी -

कृषि विद्यापीठांनी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत विहीत प्रपत्रात निधीची मागणी नोंदवावी.व त्याप्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावी. व जिल्हाधिकारी यांनी शासनाच्या नियोजन विभागाकडे मागणी नोंदवावी. शासनाकडून (नियोजन विभाग) जिल्हानिहाय अनुदान मंजुर झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत कृषि विद्यापीठांना अनुदान वितरीत करण्यात यावे.

१२.७.४ अनुदानाचे दर, वाटप पध्दती व निकष -

रोजगार हमी योजनेशी निगडीत फळविकास कार्यक्रमांतर्गत या बाबतच्या सुचना वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

१२.७.५ कृषि विद्यापीठांच्या जबाबदा-या -

अ) विद्यापीठाचे संबंधीत प्रक्षेत्र अधिकारी यांनी त्यांच्या स्वाक्षरीने करारनामे तयार करुन प्रस्तावासोबत द्यावा लागेल.

ब) त्यांनी या कार्यक्रमांतर्गत भाग घेण्याकरीता विहीत ठराव करुन प्रस्तावा सोबत द्यावा लागेल.

क) कृषि विद्यापीठांच्या प्रक्षेत्रावर लागवड करण्यात येणा-या फळझाडांची सर्व कामे रोजगार हमी योजनेतून होत असल्याने सर्व कामे मजुरा कडूनच करुन घेण्यात यावी. कृषि विद्यापीठांनी मजुरांची उपलब्धता व त्यांचेकडून काम करुन घेणे व त्या संबंधीचे प्रमाणपत्र सादर करावे.

ड) लागवडीकरीता लागणारी सर्व कागदपत्रे विद्यापीठांनी मिळवावयाची असून प्रकल्प अहवाल त्यांनी तयार करावयाचा आहे.

ई) सर्व विद्यापीठांकडून त्यांना दिलेल्या लक्षांका पेक्षा जास्त लागवड होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. शासन मान्य प्रमाणकां पेक्षा व प्रशासकीय मान्यते पेक्षा जादा होणारा खर्च संबंधीत विद्यापीठास करावा लागेल.

फ) ज्या फळझाडांची लागवड करावयाची आहे ती नवीन जातीची आणि मातृवृक्षाचीच झाडे गृहीत धरुन लागवड करण्यात यावी. त्यामुळे पुढील काळात सदर मातृवृक्षा पासून कलमे/रोपे तसेच निर्यातक्षम फळांचे उत्पादन सहज मिळू शकेल.कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर फळझाड लागवड करतांना सदरची लागवड शेतक-यांच्या दृष्टीने आदर्श प्रात्यक्षिक होईल अशा रितीने कार्यक्रम राबविण्यात यावा.

१२.७.६. कलमा रोपांचा पुरवठा -

कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर लागवडीसाठी लागणारी कलमे/रोपे विद्यापीठांनीच उत्पादित केलेली वापरावीत.रोजगार हमी योजनेशी निगडीत फळविकास कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ या वर्षासाठी कलमा /रोपांच्या निश्चित करण्यात येणा-या दरानुसार अनुज्ञेय राहील.

१२.७.७. मासिक प्रगती अहवाल -

सदरचा कार्यक्रम मंजुर केलेल्या उद्दीष्टांनुसारच राबविण्यात यावा व या योजने अंतर्गत केलेल्या कामाचा प्रगती अहवाल सोबत दिलेल्या प्रपत्र १ ते ४ मध्ये नमूद करून विभागीय कृषि सह संचालक यांचे मार्फत कृषि आयुक्तालयातील फलोत्पादन विभागास दर महिन्याच्या ५ तारखेपर्यत सादर करावा व फलोत्पादन संचालक हे शासनास अहवाल सादर करतील.

१३. कलमे/रोपांचा पुरवठा/नियोजन :-

संचालक फलोत्पादन यांनी लागवड हंगामापुर्वी शासकीय रोपवाटीका कृषि विद्यापीठ/खाजगी पंजीकृत रोपवाटीके वरील लागवडी योग्य रोगमुक्त व कीडमुक्त व चांगल्या गुणवत्तेची प्रमाणात केलेली कलमे/रोपांचे आवंटन द्यावे व त्याप्रमाणे संबंधितांना कळविण्यात यावे.

१४. रासायनिक खते व रोप सरंक्षण औषधे -

या कार्यक्रमा साठी रासायनिक खते व रोप सरंक्षण औषधे महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या.आणि विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटींग सोसायटी नागपूर, यांचे मार्फत पुरविण्याची व्यवस्था करण्यात यावी.रासायनिक खते व रोपसरंक्षण औषधे शेतक-यांना परवानापत्रावर (परमीटवर) उपलब्ध करुन देण्यात यावी.

१४.१ या कार्यक्रमासाठी रासायनिक खते व रोप संरक्षण, औषधे खरेदी विक्री संघाकडून/विविध कार्यकारी सोसायटी कडून शेतक-यांनी स्वतः खरेदी केल्यास खरेदी पावतीचे नोंद घेऊन अनुज्ञेय अनुदान देण्यात यावे.

१५. मोजमाप घेणे व अनुदानाची वितरण करण्याची पध्दती :-

१५.१ लाभार्थीने केलेल्या कामाचे मोजमाप तसेच पडताळणी ही विविध पातळीवरील अधिकारी व कर्मचारी यांनी परिशिष्ट क्रमांक ८ वर दर्शविल्या प्रमाणे करावी.

१५.२ फळझाड लागवडीसाठी खड्डे खोदल्या नंतर मापन पुस्तिकेमध्ये नोंद घ्यावी व खडडे खोदण्या साठीचे अनुदान लाभार्थीना लागवडीची वाट न पाहता वितरित करावे.अनुदान वितरित करतांना प्रस्तावित कार्यपध्दतीचा अवलंब करावा. उर्वरित अनुदान पूर्वीच्या विहित पध्दतीप्रमाणे देण्यात यावे.

१५.३ सध्याच्या रोजगार हमी योजने मधील खालील तरतुदी शिथिल करुन हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

१५.४ काम करीत असलेल्या लाभधारकांना हजेरीपट ठेवण्यात येणार नाही.तथापि, लाभार्थी आपल्या कुंटूबातील ज्या व्यक्तिच्या नांवे त्यांच्या जमिनीवर या कार्यक्रमा खाली काम घेण्यापूर्वी जाहीर करील त्या व्यक्ती रोजगार हमी योजने खाली काम करणार आहेत असे समजण्यात येईल.

१५.५ रोजगार हमी योजने मधील खालील तरतुदी देखील शिथिल करण्यांत आलेल्या आहेत:-

अ) जसे सावलीसाठी शेड उभारणे, औषधे ठेवणे इत्यादी.

ब) धान्यासाठी कुपन्स देणे हे हया कार्यक्रमात अभिप्रेत नाही.

१६. इतर संकीर्ण बाबी अंतर्गत उपलब्ध अनुदान / खर्च:-

फळबाग लागवड खर्च प्रमाणकातील इतर संकीर्ण बाबी खालील साहित्य-सामुग्री साठी प्रस्तावित करण्यांत आलेली तरतूद आकस्मिक खर्चासाठी एकत्रित करुन यामधून कलमे/रोपे वाहतुकीसाठी आंतरराज्य व आंतरजिल्हा आणि जिल्हयांतर्गत वाहतुकीचा जादा खर्च, अत्यावश्यक हॅडबिल/फॉर्म, वर्क रजिस्टर मापन पुस्तिका इत्यादी छपाई,फळझाड लागवडीविषयी प्रसिध्दी पुस्तके, स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी, स्टेशनरी, पी.ओ.एल. लाभार्थ्याचे गट स्थापन करणे, विक्री व्यवस्था व प्रक्रीया याबाबत प्रशिक्षण, लाभार्थ्यांचे प्रशिक्षण इत्यादी साठी खर्च करता येईल. ही रक्कम लाभार्थ्यास वाटण्यात येऊ नये. प्रशासकीय मंजूरी देताना उपरोक्त बाबी खाली एकत्रीत निधी वेगळया खात्यात जमा करण्यात यावा. व त्या निधीतून वरील आकस्मीक बाबीवर खर्च करण्यात यावा.त्यातून केलेल्या खर्चाची स्वतंत्र व लेखी नोंद ठेवावी. व लेखा तपासणी साठी उपलब्ध करुन द्यावी. एकूण संपूर्ण खर्चाचे मर्यादेचे अधिन राहून संबंधीत अधिका-यांनी दिलेल्या वित्तीय अधिकारा नुसार खर्च करावा.

**स्वाक्षरीत/-**
**संचालक फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, म.राज्य, पुणे-५**

**प्रत,**

**१. विभागीय कृषि सहसंचालक, यांना माहिती** व पुढिल कार्यवाहीसाठी अग्रषित,

**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** व पुढिल कार्यवाहीसाठी अग्रषित

परिशिष्ठ-३ (ब)

१. कातळ जमिनीत आंबा लागवड

सन २०१४-१५ मध्ये कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्हयांत कातळ जमिनीवर आंबा लागवडीची योजना रोजगार हमी योजनेशी निगडीत फळविकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना.

लाभधारक निवड अर्हता -

अ) ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्हयांतील लाभार्थीचे कमीत कमी ०.१० हेक्टर क्षेत्र व जास्तीत जास्त १० हेक्टर क्षेत्रावर या योजनेतंर्गत आंबा लागवड करता येईल.

ब) ज्या शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत या पूर्वी भाग घेतला असेल व कार्यक्रमांतर्गत १० हेक्टर पर्यंत फळबाग लागवड केलेली आहे अशा लाभार्थ्यांना देखील या योजनेचा लाभ देता येईल.

क) कातळ जमिनीवर आंबा कलमांची लागवड १० x १० मीटर अंतरावर करण्यांत यावी.

२. नारळ बागेतील मसाला आंतरपिके

कोकण विभागातील सर्व जिल्हयांत रोजगार हमी योजनेतंर्गत नारळ बागेत आंतरपीक म्हणून मिरी, लवंग, जायफळ, दालचिनी व सुपारी या मसाला पिकांची लागवड सन २०१४-१५ मध्ये राबविण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना-

अ) लाभधारक निवड अर्हता-

१) ज्या शेतकऱ्याकडे जुन्या नारळाच्या ८ वर्षे व त्यावरील वयाच्या बागा आहेत त्यांना योजनेचा लाभ देण्यांत यावा.

२) ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्हयांत तसेच सातारा जिल्हयातील मौजे तापोळा, जावळी तालुक्या मधील कोयना प्रकल्पग्रस्त शेतक-याकडून कमीत-कमी ०.१० हेक्टर क्षेत्रावर सलग नारळ बागांचे क्षेत्र आहे त्यांना योजनेचा लाभ देण्यात यावा.

ब) लाभ द्यावयाचे क्षेत्र-

१) प्रति लाभार्थीना नारळ बागेत मसाला आंतरपिकाचा कमीत कमी ०.१० हेक्टर व जास्तीत जास्त २ हेक्टर इतक्या क्षेत्रावर लाभ देण्यात यावा.

२) नारळ बागेत मिरी, लवंग, जायफळ व दालचिनी या मसाला पिकांची स्वतंत्र लागवड न करता
मिरी - लवंग अथवा मिरी - जायफळ अथवा मिरी - दालचिनी अशाप्रकारे लागवड करण्यांत यावी.

३) सुपारी पिकाची लागवड करण्यात यावी.

३. भात खाचराच्या बांधावर फळझाड लागवड

सन २०१४-१५ मध्ये रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयात रोजगार हमी योजनेशी निगडीत फळविकास कार्यक्रमात भात खाचराच्या बांधावर फळझाड लागवड कार्यकम राबविण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना.

अ) लाभधारक निवड अर्हता :

३-अ.१.रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमाचा ज्यांनी लाभ घेतलेला आहे परंतु त्यांनी ही योजना यशस्वीपणे राबविली नाही त्यांचा लाभार्थी म्हणून विचार करण्यांत येऊ नये.

३-अ.२.ज्या लाभार्थीनी रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमांर्तत ४ हेक्टर व कोकण विभागासाठी १० हेक्टर क्षेत्रापर्यंत लाभ घेतलेला आहे. अशा लाभार्थीस या योजनेचा लाभ देण्यांत येऊ नये.

३-अ.३ लाभ धारकाने भात खाचरांच्या बांधावर फळबाग लागवड करण्यासाठी १ × १ × १ मीटरचा ओटा किंवा चौथरा तयार करणें आवश्यक आहे.

३-अ.४. कृषि विद्यापिठाच्या शिफारशीनुसार माथ्यावरील भागात असणा-या बांधावर फळझाड लागवड करावी. कारण तेथे निचरा लवकर व चांगला होऊ शकतो. उताराखालील तळाच्या बांधावर फळझाड लागवड शक्यतो टाळावी. भात खाचराचे बांधावर लागवड करताना दोन झाडातील अंतर शिफारशीप्रमाणे ठेवून सलग पिकांच्या हेक्टरी झाडांच्या संख्येनुसार क्षेत्र निश्चित करुन त्याप्रमाणे क्षेत्रानुसार लाभार्थीस अनुदान वितरीत करावे.

३-अ.५. सामायिक बांधावर सदरची योजना राबवू नये.

ब) लाभ द्यावयाचे क्षेत्र :

३-ब.१. एका लाभार्थ्यास किमान ०.१० हेक्टर व जास्तीत जास्त २ हेक्टर इतक्या क्षेत्रावर लाभ देण्यांत यावा. बांधावर लागवड करताना आंबा, काजू, पेरु, नारळ, आवळा या फळपिकाची निवड करण्यांत यावी, कारण इतर फळपिकांच्या सावलीमुळे मूळ पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असते. म्हणजेच झाडांची संख्या सलग लागवडीतील फळझाडाच्या निर्धारित हेक्टरी प्रमाणकानुसार असावी.हा कार्यक्रम लाभार्थींना प्रशिक्षण, कामाचे प्रस्तावांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे, लाभार्थींच्या जबाबदा-या, अनुदानाची मागणी व वितरण, फळांचे कलमे / रोपे यांचे नियोजन व पुरवठा, फळबाग लागवडीची मुदत इत्यादी रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन विकास कार्यक्रमाच्या विहीत केलेल्या पध्दतीनुसार राबविण्यांत येईल.

परिशिष्ट-४ अ

योजनेत लाभ घेण्यांविषयी लाभार्थींचे विनंतीपत्र

प्रति,

मंडल कृषि अधिकारी

तालुका ............. जिल्हा .............................

विषय : रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवडीद्वारे फलोत्पादन विकास योजनेचा लाभ घेण्यांबाबत.

मी माझ्या स्वतःच्या मालकीच्या जमिनीत रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड करु इच्छित आहे. माझ्या मी धारण केलेल्या जमिनीसंंबंधी माहिति खालीलप्रमाणे आहे.

१. शेतक-याचे नांव / संस्थेचे नांव :-

२. गाव .......... तालुका .............. जिल्हा ............................

३. लाभार्थ्यांची वर्गवारी (अनु.जाती/अनु.जमाती/भटक्या विमुक्त/ महिला/इतर)

एकूण क्षेत्र ८-अ प्रमाणे लागवडीचा भूमापन क्रमांक .............. क्षेत्र .........

४. संयुक्त खातेदार असल्यास अर्जदाराच्या हिश्याचे प्रमाणानुसार

